## संक्षिप्त

### तिरंदाजी : भारताला कांस्यपदकाच्या आशा

**बर्लिन :** विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेच्या चौथ्या टप्प्यात रिकव्‍‌र्ह संघ एकीकडे झगडत असताना भारताच्या कंपाऊंड पुरुष संघाने मात्र कांस्यपदकाच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. अभिषेक वर्मा, अमन सैनी आणि अमनजीत सिंग यांचा समावेश असलेल्या पाचव्या मानांकित भारतीय त्रिकुटाने स्पेनला २२८-२२२ अशा फरकाने नमवून आपल्या अभियानाला प्रारंभ केला. मग उपांत्यपूर्व फेरीत भारताने १३व्या मानांकित स्वीडनचा २३१-२२९ असा पराभव केला. मग उपांत्य फेरीत अव्वल मानांकित अमेरिकेने २३३-२२८ असा पराभव केल्यामुळे भारताला तिसऱ्या-चौथ्या स्थानासाठी लढावे लागणार आहे. कांस्यपदकाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या या सामन्यात भारताची कमजोर जर्मनीशी लढत होणार आहे.

### नेमबाजी : महेश्वरी चौहानला कांस्यपदक

**अस्ताना :** भारतीय नेमबाज महेश्वरी चौहानने आशियाई शॉटगन अजिंक्यपद स्पर्धेत महिलांच्या वैयक्तिक स्किट प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली. २००९नंतर स्किट प्रकारात पदक पटकावणारी महेश्वरी ही पहिली भारतीय महिला नेमबाज आहे. महेश्वरीने ४० गुणांसह कांस्यपदक निश्चित केले, तर चीनच्या मेंग वेई (५५ गुण) आणि थायलंडच्या सुतीया जिएवचालोएमित (५४) यांनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदक जिंकले. सांघिक गटात महेश्वरीने रश्मी राठोडसह ६४ गुणांची कमाई करून भारताला रौप्यपदक मिळवून दिले.

### टेनिसपटू अझारेंका, सिलिकची माघार

**सिनसिनाटी :** व्हिक्टोरिया अझारेंका आणि गतविजेता मारिन सिलिक यांनी पुढील आठवड्यात होणाऱ्या एटीपी आणि डब्लूटीए सिनसिनाटी टेनिस स्पर्धेतून माघार घेतली आहे. आठ वर्षांच्या मुलाच्या पालकत्व हक्कावरून न्यायालयात सुरू असलेल्या खटल्यामुळे अझारेंकाने हा निर्णय घेतला आहे.

### बार्सिलोनाला नेयमारच्या कराराची रक्कम मिळाली

**पॅरिस :** पॅरिस सेंट-जर्मेन फुटबॉल क्लबमध्ये (पीएसजी) विक्रमी किमतीत दाखल झालेल्या नेयमारच्या कराराची संपूर्ण २६ कोटी डॉलर ही रक्कम बार्सिलोना क्लबला मिळाल्याचे शुक्रवारी सांगण्यात आले.

### एटीकेच्या चमूत दुसरा परदेशी खेळाडू

**मुंबई :** इंडियन सुपर लीगचे दोन वेळा जेतेपद पटकावणाऱ्या ॲटलेटिको दी कोलकाता क्लबने शुक्रवारी पोर्तुगालच्या जोस एगास दॉस सांतोस ब्रँको याला करारबद्ध केले आहे. तो कोलकाताकडून खेळणार आहे.



# भारताचा इतिहास घडवण्याचा निर्धार

## वेगवान खेळपट्टीवर श्रीलंकेविरुद्धची तिसरी कसोटी आजपासून

> खेळाडूंच्या आचारसंहितेसंदर्भातील नियमांची अंमलबजावणी करताना आयसीसीने सातत्य दाखवावे, अशी मी विनंती करीन. परिस्थिती जशी दिसते, तशी ती नसते. खेळ अधिक उत्तम होण्यास मदत व्हावी, याच हेतून हे भाष्य मी करीत आहे. त्यामुळे कोणत्याही गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.
> – विराट कोहली, भारताचा कर्णधार

**संघ**

**भारत :** विराट कोहली (कर्णधार), शिखर धवन, लोकेश राहुल, चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे, रोहित शर्मा, रविचंद्रन अश्विन, वृद्धिमान साहा (यष्टीरक्षक), इशांत शर्मा, उमेश यादव, हार्दिक पंड्या, भुवनेश्वर कुमार, मोहम्मद शमी, कुलदीप यादव, अभिनव मुकुंद, अक्षर पटेल.

**श्रीलंका :** दिनेश चंडिमल (कर्णधार), उपूल थरंगा, दिमुथ करुणारत्ने, कुशल मेंडिस, अँजेलो मॅथ्यूज, लाहिरू थिरिमाने, धनंजय डी'सिल्व्हा, निरोशान डिक्वेला (यष्टीरक्षक), दिलरुवान परेरा, लाहिरू कुमारा, विश्वा फर्नांडो, दुष्मंता चामीरा, लाहिरू गॅमेज, लक्षण संदाकान, मलिंदा पुष्पकुमारा.

**सामन्याची वेळ**
सकाळी १० वाजल्यापासून.

**थेट प्रक्षेपण**
सोनी सिक्स, सोनी टेन ३ आणि एचडी.

**पीटीआय, कँडी**

**विराट कोहलीच्या** नेतृत्वाखालील भारतीय संघ एक नवा इतिहास घडवण्यासाठी उत्सुक आहे. परदेशातील तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील ऐतिहासिक निर्भेळ यश भारताला साद घालत आहे. त्यामुळे वेगवान गोलंदाजांना अनुकूल पल्लीकेलच्या खेळपट्टीवर शनिवारपासून सुरू होणारा श्रीलंकेविरुद्धचा तिसरा आणि अखेरचा सामना भारतासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

भारताने मालिकेतील पहिले दोन कसोटी सामने मोठ्या फरकाने जिंकले आहेत. गॉल येथील पहिल्या सामन्यात भारताने ३०४ धावांनी दणदणीत विजय मिळवला, तर कोलंबोतील दुसऱ्या सामन्यात एक डाव आणि ५३ धावांनी शानदार विजय साजरा केला.

गेले काही महिने श्रीलंकेचा संघ संक्रमण अवस्थेतून जात आहे. त्यामुळे भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेत हा संघ झगडतानाच दिसतो आहे. कँडीमध्ये खेळपट्टीचे स्वरूप बदलून किमान अखेरचा सामना जिंकून शेवट गोड करावा, अशी लंकेची धारणा आहे. मात्र हे सारे हवामानावर अवलंबून आहे. पावसामुळे भारताला शुक्रवारी सराव सत्र रद्द करावे लागले.

फिरकीची हत्यारे बोथट ठरल्यानंतर आता वेगवान गोलंदाजांसह आक्रमण करण्याचे श्रीलंकेने ठरवले आहे. त्यामुळे दुष्मंता चामीरा व लाहिरू गॅमेज यांचा संघात समावेश केला आहे. दुखापतग्रस्त नूवान प्रदीप व रंगना हेराथ या खेळाडूंची जागा ते घेतील.

खेळपट्टीचे हिरवेगार स्वरूप पाहता कोहलीला भुवनेश्वर कुमार या तिसऱ्या वेगवान गोलंदाजाला निलंबित रवींद्र जडेजाच्या जागी संघात स्थान द्यायला लागेल. कोहलीच्या नेतृत्वाच्या कारकीर्दीत कसोटी क्रिकेटमधील मिळालेल्या संधीचे भुवीने सोने केले आहे. मात्र फलंदाजीचीही क्षमता असणारा भुवनेश्वर हार्दिक पंड्याची जागा घेण्याची शक्यता आहे, तर 'चायनामन' कुलदीप यादव दुसऱ्या फिरकीपटूचे स्थान संघात घेईल.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध धरमशाला येथील उसळणाऱ्या खेळपट्टीवर मनगटी फिरकी गोलंदाज कुलदीपने लक्षवेधी कामगिरी बजावली होती. पहिल्या डावात त्याने मिळवलेले चार बळी निर्णायक ठरले होते.

कोहलीने आतापर्यंत २८ कसोटी सामन्यांत भारताचे नेतृत्व केले आहे. त्याने आपला ११ जणांचा चमू कधीच कायम ठेवलेला नाही. त्यामुळे २९व्या कसोटीतही तो कोणते बदल करील, हे उत्सुकतेचे ठरेल.

श्रीलंकेच्या संघाची सद्य:स्थिती पाहता भारताला मालिकेवर ३-० असे वर्चस्व गाजवणे कठीण जाणार नाही. १९३२ मध्ये भारताच्या कसोटी पर्वाला प्रारंभ झाला. त्यानंतर आतापर्यंतच्या ८५ वर्षांच्या कसोटी इतिहासात तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने अद्याप निर्भेळ यश मिळवलेले नाही. हा इतिहास घडल्यास मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांच्या मार्गदर्शनाचीही फलश्रुती ठरू शकेल. या संघाकडे नवा इतिहास घडवण्याची क्षमता आहे, असे शास्त्री यांनी मालिकेपूर्वी ठणकावून सांगितले होते.

गतवर्षीच्या ऑक्टोबरपासून रोहित शर्मा अद्याप कसोटी पुनरागमनाच्या प्रतीक्षेत असला तरी संघ व्यवस्थापन अभिनव मुकुंदला आणखी एक संधी देण्याची दाट शक्यता आहे.



श्रीलंकेचा कर्णधार दिनेश चंडिमल, निवड समितीचे प्रमुख सनथ जयसूर्या आणि व्यवस्थापक असंका गुरुसिंघे खेळपट्टीची पाहणी केल्यानंतर गांभीर्याने चर्चा करताना.

> मालिका अद्याप संपलेली नाही. एक कर्णधार म्हणून मला आशा सोडायला कधीच आवडत नाही. समोर जागतिक क्रमवारीतील अव्वल संघ असो किंवा तळाचा, मला जिंकायला हवे. सामना जिंकण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करतो, परंतु विरोधात जाणाऱ्या निकालावर नियंत्रण मिळवता येत नाही. ०-२ अशा पिछाडीमुळे दडपण नक्कीच आहे, परंतु तिसरी कसोटी जिंकण्याचा आमचा निर्धार आहे.
> – दिनेश चंडिमल, श्रीलंकेचा कर्णधार

# मुलखावेगळा अनुभव रेहमानसाठी स्वप्नवत

**मिलिंद ढमढेरे, अहमदाबाद**

**प्रो कबड्डी** लीगविषयी खूप ऐकले होते. त्यामध्ये मला भाग घेण्याची संधी मिळेल असे कधीच वाटले नव्हते. यंदा या लीगमध्ये भाग घेण्याची संधी मिळाल्यामुळे मी स्वप्नवत अनुभवातून जात आहे, असे उद्गार पुणेरी पलटणचे प्रतिनिधित्व करणारा बांगलादेशचा खेळाडू झियाउर रेहमानने काढले आहेत.

या स्पर्धेत रेहमानला प्रथमच खेळण्याची संधी मिळाली आहे. विश्वचषक स्पर्धेतील अप्रतिम पकडींच्या बळावर रेहमानसाठी यंदा प्रो कबड्डीची दारे खुली झाली. नौदलात नोकरी करणाऱ्या २६ वर्षीय रेहमानला लहानपणापासूनच कबड्डीचे वेड आहे. अर्थात शालेय जीवनात तो क्रिकेट खेळत असे. त्या वेळी क्रिकेटमध्ये कारकीर्द घडवण्याचे त्याने ठरवले होते. परंतु नौदलात नोकरी मिळाल्यानंतर त्याला क्रिकेट खेळणे शक्य झाले नाही.



नौदलातील अनेक जण जहाजावर कबड्डी खेळत असल्यामुळे त्यानेही कबड्डी खेळण्यास सुरुवात केली. अवघ्या दोन वर्षांमध्ये त्याने बांगलादेश संघात स्थान मिळवले.

बांगलादेशातील राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेविषयी रेहमान म्हणाला, ''नौदलाच्या संघात चढाया करणाऱ्यांची कमतरता नाही. आपल्याला राष्ट्रीय संघात स्थान मिळवायचे असेल तर पकडीचे कौशल्य अधिक आत्मसात केले पाहिजे असा मनाशी निश्चय करीत पकडी करण्याच्या कौशल्यावर मी अधिक लक्ष केंद्रित केले. सुदैवाने हे तंत्र मला जमले. आमच्याकडेही राष्ट्रीय स्पर्धा विलक्षण चुरशीने खेळल्या जातात. विजेतेपद कोण मिळवेल हे सांगता येत नाही. भारताप्रमाणे आमच्याकडेही क्रिकेटची अफाट लोकप्रियता आहे, तरीही कबड्डीला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळतो.''

प्रो लीगविषयी विचारले असता तो म्हणाला, ''हा माझ्या आयुष्यातील संस्मरणीय कालावधी आहे. आमच्या देशातही या लीगचे चाहते आहेत. अशा लीग आमच्याकडे आयोजित केल्या तर निश्चितपणे आमच्याकडेही कबड्डी हा खेळ क्रिकेटला मागे टाकेल. लीगचे प्रक्षेपण, त्याची मांडणी, समालोचन या सर्वच गोष्टी माझ्यासाठी अद्भुत आहेत.''

नौदल व्यवस्थापनाने पगारी रजा दिली काय असे विचारले असता रेहमान म्हणाला, ''मला बिनपगारी रजाच घ्यावी लागली. अर्थात नोकरीची हमी ठेवूनच मला त्यांनी या स्पर्धेसाठी परवानगी दिली आहे, हीच माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. या लीगमधील अनुभवाचा फायदा घेत राष्ट्रीय स्पर्धेत नौदल संघाला विजेतेपद मिळवून द्यावे, हीच त्यांची माफक अपेक्षा आहे.''

**प्रो कबड्डी लीग**

### गुजरातचा यू मुंबावर सफाईदार विजय

**अहमदाबाद :** कोणत्याही संघाचा महत्त्वाचा आधारस्तंभ असलेल्या खेळाडूंना प्रभावहीन केले की आपोआप विजय मिळवता येतो, ही रणनीती उपयोगात आणून गुजरात फॉर्च्युनजायंट्स संघाने यू मुंबावर ३९-२१ अशी मात केली आणि प्रो कबड्डी लीगमध्ये शानदार विजय मिळवला.

**आजचे सामने**

- तेलुगू टायटन्स वि. उत्तर प्रदेश योद्धा
- गुजरात फॉर्च्युनजायंट्स वि. दबंग दिल्ली
- वेळ : रात्री ८ वाजल्यापासून
- थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स वाहिनी.

# बीसीसीआय देवापेक्षा वरचढ नाही -श्रीशांत

**पीटीआय, नवी दिल्ली**

**वेगवान गोलंदाज** एस. श्रीशांतवरील आजीवन बंदी उच्च न्यायालयाने उठवल्यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या निर्णयाविरोधात दाद मागण्याचे ठरवले आहे. याबाबत श्रीशांतने तीव्र शब्दांत आपला संताप प्रकट केला.

शुक्रवारी झालेल्या बीसीसीआयच्या बैठकीमध्ये केरळ उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाकडे श्रीशांतबाबतच्या निर्णयाविरोधात याचिका दाखल करण्याचे निश्चित करण्यात आले. याबाबत श्रीशांतने 'ट्विटर'वर भावनाविवश होऊन म्हटले आहे की, ''बीसीसीआय@ मी भीक मागत नाही. माझा जिवंतपणा मला परत देण्याविषयीच विचारणा करीत आहे. हा माझा हक्क आहे. तुम्ही देवापेक्षा वरचढ नाहीत. मी पुन्हा खेळेन...? एकदा नव्हे, पुन:पुन्हा निर्दोष असल्याचे सिद्ध होऊनही मला इतकी वाईट वागणूक मिळत आहे. बीसीसीआय, हे अतिशय वाईट आहे.''



२०१३ मध्ये आयपीएल निकाल निश्चितीप्रकरणी दोषी आढळल्यानंतर बीसीसीआयने श्रीशांतवर आजीवन बंदी घातली होती. गेल्या सोमवारी केरळ उच्च न्यायालयाने त्याच्यावरील बंदी उठवण्याचा निर्णय घेतला.

# आनंदची लॅग्रेव्हविरुद्ध बरोबरी

**सिंक्यूफिल्ड बुद्धिबळ स्पर्धा**

**सेंट लुइस (अमेरिका) :** भारताचा ग्रँड मास्टर आणि पाच वेळा विश्वविजेतेपद नावावर करणाऱ्या विश्वनाथन आनंदने सिंक्युफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेच्या आठव्या फेरीअखेरीस संयुक्त अव्वल स्थान कायम राखले आहे. आठव्या फेरीत त्याला फ्रान्सच्या मेक्झिमे व्हॅचियर-लॅग्रेव्हविरुद्ध अनिर्णीत निकालावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेत पांढऱ्या मोहऱ्यांनी अखेरचा डाव खेळणाऱ्या आनंदने चांगली सुरुवात करताना सामन्यावर पकड घेतली होती, परंतु व्हॅचियर-लॅग्रेव्हने अप्रतिम बचाव करताना सामना बरोबरीत सोडवला. आनंद व व्हॅचियर-लॅग्रेव्हसह अर्मेनियाच्या लेव्हॉन ॲरोनियन पाच गुणांसह संयुक्त आघाडीवर आहे. त्याला रशियाच्या पीटर स्विडलरने बरोबरीत रोखले. रशियाचा सर्जी कर्जाकिनने अमेरिकेच्या वेल्सी सो याला पराभूत केले.

**भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादित**
(भारत सरकारचा उपक्रम)
''शिपिंग हाउस'' २४५, मैडम कामा रोड, नरीमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१
• Website: www.shipindia.com • Twitter: @shippingcorp
• CIN-No.: L63030MH1950GOI008033
SCI Navratna Company ISO 9001 - 2008 Company

**३०.०६.२०१७ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता स्वतंत्र अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष**

(रक्कम रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | ३०.०६.२०१७ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०१७ रोजी संपलेले मागील वर्ष (लेखापरीक्षित) | ३०.०६.२०१६ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|
| १ | प्रवर्तनाकडील एकूण उत्पन्न (निव्वळ) | ८६,४७८ | ३४४,६८७ | ८२,६२६ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा/ (तोटा) (कर, आक्षेपार्ह आणि / किंवा असाधारण आयटम्सपूर्वी) | ८२८ | १७,७२४ | ७,२६६ |
| ३ | करापूर्वी कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) (आक्षेपार्ह आणि / किंवा असाधारण आयटम्सनंतर) | ८२८ | १७,७२४ | ७,२६६ |
| ४ | करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) (आक्षेपार्ह आणि / किंवा असाधारण आयटम्सनंतर) | (६७२) | १३,५५२ | ५,५९१ |
| ५ | कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न (कालावधीकरिता (करानंतर) नफा / (तोटा) समाविष्ट आणि अन्य व्यापक उत्पन्न (करानंतर) | (४६३) | १४,३९० | ५,३२० |
| ६ | समन्याय भागभांडवल | ४६,५८० | ४६,५८० | ४६,५८० |
| ७ | राखीव (पुनर्मूल्यन राखीव वगळता) | - | ६४०,१५८ | - |
| ८ | प्रति भाग कमाई (रु. १० प्रत्येकी) (चालू व खंडित प्रवर्तनाकरिता) | | | |
| | मूलभूत : | (०.१४) | २.९१ | १.२० |
| | सौम्य केलेले : | (०.१४) | २.९१ | १.२० |

१. वरील निष्कर्षांचे लेखापरीक्षा समितीद्वारा परीक्षण करण्यात आले आहे आणि १० ऑगस्ट २०१७ रोजी घेण्यात आलेल्या संचालक मंडळाच्या संबंधित सभांमध्ये त्यांच्याद्वारा मान्य करण्यात आले आहे.
२. वरील उतारा सेबी (लिस्टिंग ॲण्ड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे फाइल केलेल्या तिमाही/वार्षिक वित्तीय निष्कर्षांचा सविस्तर प्रारूप उतारा आहे. तिमाही/वार्षिक वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप www.bseindia.com व www.nseindia.com या स्टॉक एक्स्चेंजच्या संकेतस्थळांवर आणि www.shipindia.com या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ISO 9001 : 2008 APPROVED BY IRQS

स्थळ : मुंबई
तारीख : १०.०८.२०१७

भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादितकरिता
स्वाक्षरी/-
कॅप्टन अनुपकुमार शर्मा
अध्यक्ष व व्यवस्थापन संचालक

055

मालाचे परिवहन. जीवनात परिवर्तन

**FINANCIAL RESULTS Q1**

**CG POWER AND INDUSTRIAL SOLUTIONS LIMITED**
(Formerly Crompton Greaves Limited)
CIN: L99999MH1937PLC002641
Registered Office: 6th Floor, CG House, Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai - 400 030
Tel No.: 022 - 24237777 Fax No.: 022-24237733
E-mail ID: investorservices@cgglobal.com Website: www.cgglobal.com

**EXTRACT OF STANDALONE UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2017**

(₹ in crore)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 30.06.2017 Unaudited | Previous year ended 31.03.2017 Audited | Quarter ended 30.06.2016 Unaudited |
|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations - for continuing operations | 1260.68 | 4761.43 | 1128.58 |
| 2 | Net Profit for the period (before Tax and Exceptional items) (for continuing and discontinued operations) | 32.70 | 223.56 | 48.00 |
| 3 | Net Profit for the period before tax (after Exceptional items) (for continuing and discontinued operations) | 45.19 | 123.76 | 46.59 |
| 4 | Net Profit for the period after tax (after Exceptional items) (for continuing and discontinued operations) | 30.99 | 124.46 | 35.82 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 29.57 | 71.24 | 31.99 |
| 6 | Equity Share Capital | 125.35 | 125.35 | 125.35 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in Audited Balance Sheet of the previous year* | | | |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 2 each) (Not annualised) (for continuing and discontinued operations) | | | |
| | (a) Basic | 0.49 | 1.99 | 0.57 |
| | (b) Diluted | 0.49 | 1.99 | 0.57 |

* Reserves (excluding Revaluation Reserve) as at 31st March, 2017 ₹ 4073.94 crore

**EXTRACT OF CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2017**

(₹ in crore)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 30.06.2017 Unaudited | Previous year ended 31.03.2017 Audited | Quarter ended 30.06.2016 Unaudited |
|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations - for continuing operations | 1436.42 | 6119.75 | 1523.35 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional Items, Share of Associates, Joint Venture and Minority Interest) (for continuing and discontinued operations) | (70.71) | (410.58) | 2.14 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional Items, Share of Associates, Joint Venture and Minority Interest) (for continuing and discontinued operations) | (71.46) | (485.11) | 1.78 |
| 4 | Net Loss for the period after tax (after Exceptional Items, Share of Associates, Joint Venture and Minority Interest) (for continuing and discontinued operations) | (86.03) | (490.86) | (10.55) |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Loss for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (137.85) | (487.33) | 48.06 |
| 6 | Equity Share Capital | 125.35 | 125.35 | 125.35 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in Audited Balance Sheet of previous year* | | | |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 2 each) (Not annualised) (for continuing and discontinued operations) | | | |
| | (a) Basic | (1.37) | (7.83) | (0.17) |
| | (b) Diluted | (1.37) | (7.83) | (0.17) |

* Reserves (excluding Revaluation Reserve) as at 31st March, 2017 ₹ 3985.74 crore

**Notes:**
1 The above is an extract of the detailed format of Quarterly / Year ended Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly / Year ended Financial Results are available on the websites of the Stock Exchanges (www.bseindia.com and www.nseindia.com) and Company's website (www.cgglobal.com)
2 The above unaudited standalone and consolidated results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on 11th August, 2017. The statutory auditors have carried out a limited review of the financials of the Company as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (the 'Listing Regulations').

For **CG Power and Industrial Solutions Limited**

Place: New Delhi
Date : 11th August, 2017

AVANTHA GROUP COMPANY

K.N. Neelkant
CEO & Managing Director
DIN: 05122610

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. लोकसत्ता कार्यालय : एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. पुणे कार्यालय :एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. नागपूर कार्यालय : १९, ग्रेट नाग रोड, उंटखाना, नागपूर -४४० ००९. दूरध्वनी : ०७१२-२७०६९९७/२७०६८९७ ■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर * (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)
R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रूपये.